**पशुसंवर्धन व्यवसायास " कृषि समकक्ष दर्जा" लागू केल्याने पशुपालकांना खेळत्या भागभांडवलावरील व्याजदरात ४ टक्के सवलत देणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः पविआ- ०३२५/प्र.क्र.७४/पदुम-३**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार इमारत, मुंबई ४०००३२
दिनांक: ११ फेब्रुवारी, २०२६

**वाचा-** कृषि व पदुम विभाग शासन निर्णय क्र. पविआ- ०३२५/ प्र.क्र.७४/पदुम-३,दि. ३१.०७.२०२५.

**प्रस्तावना -**

महाराष्ट्र आर्थिक सल्लागार परिषदेने सन २०२८ पर्यंत महाराष्ट्राची अर्थव्यवस्था १ ट्रिलियन डॉलर पर्यंत पोहोचविण्यासाठी सादर केलेल्या पथदर्शी आराखडयानुसार सदर उद्दिष्ट साध्य करण्यासाठी आर्थिक सल्लागार परिषदेने जे घटक उत्पन्न वाढीस चालना देऊ शकतील, असे ८ घटक सुनिश्चित केले असून त्यामध्ये “कृषी व संलग्न”या घटकाचा समावेश आहे. तसेच, निती आयोगाने सन २०२१ च्या अहवालात पशुसंवर्धन व्यवसायापासून देशाच्या/ राज्याच्य सकल उत्पादनात पशुसंवर्धन व्यवसायाचा सहभाग वाढविण्यासाठी उपाययोजना करण्याची शिफारस केली आहे.

२ पशुपालकांना भेडसावणाऱ्या कृषी वीज दराच्या तुलनेत जास्त वीज दर, सोलर एनर्जीसाठी अनुदानाचा अभाव, ग्रामपंचायत कर,शेती कर्जाच्या व्याज दराच्या तुलनेत अधिक व्याज दराची आकारणी या अडचणींचे निराकरण झाल्यास पशुपालन व्यवसायाकडे लोकांचा कल वाढून पशुजन्य उत्पादनात वाढ होईल. व्यावसायिक नफ्यात वाढ तसेच स्पर्धात्मक वातावरण यामुळे पशुजन्य उत्पादित बाबींस मुल्यवर्धन साखळीची निर्मिती, शेती प्रमाणे गट पध्दतीने पशुसंवर्धन, अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब यासारख्या बाबीमध्ये आपोआप वाढ होईल. ही बाब विचारात घेऊन वाचा क्र. १ येथील शासन निर्णयान्वये पशुसंवर्धन व्यवसायास “कृषी समकक्ष दर्जा” देण्याचा निर्णय मा. मंत्रीमंडळाच्या मान्यतेने घेण्यात आला आहे.

३ पशुपालन व्यवसायास “कृषी समकक्ष दर्जा” लागू करण्यात आल्याने पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजनेच्या धर्तीवर खेळत्या भांडवलावरील घेतलेल्या अल्प मुदतीच्या कर्जावरील व्याज दरात ४ टक्के सवलत लागू करण्यासाठी कार्यपध्दती विहित करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

**शासन निर्णय:-**

पशुपालन व्यवसायास “कृषी समकक्ष दर्जा”लागू करण्यात आल्याने किसान क्रेडिट कार्ड धारकानी राष्ट्रीयकृत बँका, खाजगी बँका, ग्रामीण बँका, राज्य सहकारी बँक व जिल्हा सहकारी बँक यांचेमार्फत पशुपालकांनी घेतलेल्या अल्पमुदतीचे कर्जावर ४ टक्के व्याज दर सवलत देण्यासाठी खालीलप्रमाणे कार्यपध्दती विहीत करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

**अ) पात्रता**

१) प्रकल्प धारकाने केंद्र/राज्य शासन/जिल्हा परिषदेच्या कोणत्याही अनुदान योजनेचा लाभ घेतलेला नसावा.

२) पशुपालन प्रकल्पांमधील सर्व पशुधनाची एनडीएलएम (भारत पशुधन) पोर्टलवर नोंदणी आवश्यक आहे.

३) व्याज परतावा सवलत पुढीलप्रमाणे कमाल पशुधन संख्या असलेल्या पशुपालकांनाच अनुज्ञेय राहिल.

I. २५,००० मांसल कुक्कुट पक्षी / ५०,००० किंवा त्यापेक्षा कमी अंडी उत्पादक कुक्कुट पक्षी

II. ४५,००० किंवा त्यापेक्षा कमी क्षमतेच्या हॅचरी युनिट

III. १०० किंवा त्यापेक्षा कमी दुधाळ जनावरांचा गोठा

IV. ५०० किंवा त्यापेक्षा कमी मेंढी /शेळी गोठा

V. २०० किंवा त्यापेक्षा कमी वराह

४) पशुपालकांनी घेतलेल्या कर्जाची परतफेड कर्ज उचल केलेल्या तारखेपासून एक वर्षाच्या आत संपूर्ण कर्ज परतफेड करणे आवश्यक राहील.

५) सदर योजनेच्या निकषाप्रमाणे तसेच, त्यामध्ये वेळोवेळी होणाऱ्या बदलास अनुसरुन आवश्यक त्या बाबींची पूर्तता करणे लाभार्थ्यांस बंधनकारक असेल.

२. ४ टक्के व्याज दर सवलत योजनेची अंमलबजावणी करताना येणाऱ्या अडचणी सोडविण्याकरिता जिल्हा उपनिबंधक/ सहायक निबंधक यांचेशी समन्वय साधून, जिल्ह्यातील पशुपालकांना अल्प मुदतीचे कर्ज उपलब्ध करून देण्यासाठी उपायुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय) संबधित जिल्हा हे समन्वयक म्हणून काम पाहतील .

३. पशुपालकांना देण्यात येणाऱ्या व्याज परतावा सवलत देण्याकरिता निधी उपलब्ध करुन देण्याची व त्यासाठी स्वतंत्र लेखाशीर्ष उघडण्याची कार्यवाही सहकार विभागाने करावी .

**४. या योजनेचा लाभ हा शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून घेण्यात आलेल्या कर्जास लागू राहील.**

५. हा शासन निर्णय दि.१०/०७/२०२५ रोजी पार पडलेल्या मा.मंत्रीमंडळाच्या बैठकीतील निर्णयास अनुसरून निर्गमित करण्यात येत आहे. तसेच सहकार विभाग, नियोजन विभाग व वित्त विभागाच्या

सहमतीने आणि वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.६८५०/२०२५/व्यय-२, दि. १४.११.२०२५ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०२६०२१११७४३५३९८०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

MARALE NIWRUTTI BHAGUJI

Digitally signed by MARALE NIWRUTTI BHAGUJI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Agriculture and Adf Dept,
2.5.4.20=8A75C414FF50CE35220C63CD53D2EB1A99A474C02300BEEA74BB051C4C3C90A9, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=5C891DA87D2A4842558454524CC114BA5B2F67A2A80796592830D345500F15CC, cn=MARALE NIWRUTTI BHAGUJI
Date: 2026.02.11 17:45:24 +05'30'

**( नि. भा. मराळे )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत: -**

मा. राज्यपाल यांचे सचिव राजभवन मुंबई
मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव मंत्रालय मुंबई-३२
मा. उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव मंत्रालय मुंबई-३२
सर्व मा. मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव मंत्रालय मुंबई-३२
मा.विधानसभा /विधान परिषद ( सर्व)
मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य मंत्रालय मुंबई-३२
सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव , मंत्रालय मुंबई-३२.
अपर मुख्य सचिव (वित्त) महाराष्ट्र राज्य, मंत्रालय मुंबई-३२.
प्रधान सचिव (सहकार ) मंत्रालय मुंबई ३२
सचिव( पदुम) मंत्रालय मुंबई ३२
सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था ,महाराष्ट्र राज्य, पुणे.
आयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय महाराष्ट्र राज्य, मुंबई
जिल्हाधिकारी सर्व
महाव्यवस्थापक,राष्ट्रीय कृषी व ग्रामीण विकास बँक, प्रादेशिक कार्यालय पुणे
सर्व कार्यकारी संचालक, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक.
कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक.
प्रशासकीय अधिकारी, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक मुंबई.
सर्व विभागीय सह निबंधक , सहकारी संस्था
सर्व जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था.
सर्व प्रादेशिक सहआयुक्त, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभाग
सर्व जिल्हा उपायुक्त, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभाग
निवडनस्ती -पदुम -३